# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## एम. ए. मराठी (भाग २)

### मे २०११ परीक्षा

**विषय : साहित्य समीक्षा (M-२०१)**

| दिनांक : १८/५/२०११ | गुण : १०० | वेळ : दु. २.०० ते सायं. ५.०० |
|---|---|---|

**सुचना** : १. सर्व प्रश्न सोडवा.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**प्रश्न १.** अ) ललित साहित्य म्हणजे काय ते सांगून शास्त्रीय साहित्य व ललित साहित्य यातील फरक समजावून सांगा. (२०)

**किंवा**

ब) ललितसाहित्याचे प्रयोजन काय? भारतीय व पाश्चात्य साहित्यविचारांच्या आधारे स्पष्ट करा.

**प्रश्न २.** अ) साहित्यसमीक्षा म्हणजे काय? तिचे स्वरूप सांगून समीक्षेची कार्ये लिहा. (२०)

**किंवा**

ब) 'आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन या समीक्षेच्या तीन पाय-या आहेत. '- हे विधान स्पष्ट करा.

**प्रश्न ३.** अ) समाजशास्त्रीय समीक्षेचे स्वरूप सांगून तिचे सामर्थ्य व मर्यादा स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

ब) स्त्रीवादी समीक्षा म्हणजे काय ते विवेचनपूर्वक लिहा. पारंपरिक समीक्षेहून ती कोणत्या बाबतीत वेगळी ठरते ते लिहा.

**प्रश्न ४.** अ) शैलीवैज्ञानिक समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करून ती वाङ्.मयाच्या आकलनास कशी साहाय्य करते ते सोदाहरण लिहा. (२०)

**किंवा**

ब) मनोवैज्ञानिक समीक्षेमागील संकल्पनाव्यूह स्पष्ट करा.

**प्रश्न ५. टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** (२०)

१) समीक्षक माधव आचवल.

२) साहित्याची भाषा.

३) समीक्षक ना. सी. फडके.

४) आदर्श समीक्षकाचे व्यक्तिमत्त्व.